**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २९/०८/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धांना प्रारंभ

---

आज दिनांक २९ ऑगस्ट २०१८ रोजी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धांना प्रारंभ झाला. सदरच्या क्रिडा स्पर्धा हया ०३ दिवसांसाठी आयोजित करण्यात आलेल्या असुन नाशिक ग्रामीण जिल्हयातील ०८ उपविभागीय संघ व पोलीस मुख्यालयाचे संघातील पोलीस खेळाडुंनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे. उद्घाटन समारंभ प्रसंगी पोलीस खेळाडुंच्या शानदार संचलनाने क्रिडा स्पर्धांना प्रारंभ झाला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयाचे **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड** यांचे हस्ते क्रिडा ज्योत प्रज्वलीत करून स्पर्धांना प्रारंभ करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाप्रसंगी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री. सुरेश जाधव, पोलीस उपअधीक्षक आगुशा श्री. देविदास पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अतुल झेंडे, श्री. सदाशिव वाघमारे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. अशोक करपे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. साहेबराव जाधव, क्रिडा पोलीस प्रशिक्षक श्री. समाधान गवळी यांचेसह जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हजर होते.

सदर क्रिडा स्पर्धेचे शुभारंभ प्रसंगी व्हॉलिबॉलचा सामना पोलीस मुख्यालय विरूध्द निफाड विभाग या संघामध्ये पार पडला, त्यात पोलीस मुख्यालयाचे संघाने विजय मिळविला. तसेच १०,००० मीटर धावणे या स्पर्धा अटीतटीच्या झाल्या त्यात, पोलीस खेळाडु श्री. संजय आहेर हे प्रथम तर, श्री. भरत खाडे यांनी व्दितीय क्रमांक पटकविला. सदर पोलीस क्रिडा स्पर्धा हया दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी पर्यंत चालणार असुन सांघिक व वैयक्तिक क्रिडा प्रकारात वेगवेगळया स्पर्धा होणार आहे.